# महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ

(संलग्न भारतीय मजदूर संघ)

नोंदणी क्रमांक पी.एन./३९७८/दिनांक ६/२/२००९

महानिर्मिती
महाराष्ट्र राज्यविद्युत निर्मिती कंपनी मर्यादित

महा पारेषण
महाराष्ट्र राज्यविद्युत पारेषण कंपनी मर्यादित

महा वितरण
महाराष्ट्र राज्यविद्युत वितरण कंपनी मर्यादित

# कामगार संदेश

**वर्ष : १ ले   अंक : ३ रा          परिपत्रक क्र. : ३          दि. २८ सप्टेंबर २०२३**


## महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाच्या वतीने महावितरण, महापारेषण व महानिर्मिती कंपनीतील वीज कंत्राटी कामगारांसाठी पगारवाढ मागणी प्रस्ताव देण्यात आला.



महावितरणचे व्यवस्थापकीय संचालक मा.लोकेश चंद्र साहेब यांना पगारवाढीचा प्रस्ताव देताना पदाधिकारी

**मुंबई : दि.१८ सप्टेंबर :** महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाने राज्यातील महावितरण महापारेषण व महानिर्मिती कंपनीत वर्षानुवर्षे नियमित मंजूर रिक्त पदावर काम करत असलेल्या सर्व वीज कंत्राटी कामगारांना देखील पगार वाढ द्यावी अशी मागणी सतत केली होती परिणामी तिन्ही वीज कंपनी प्रशासन व ऊर्जामंत्री यांच्या या बाबतच्या सकारात्मक चर्चा व निर्णया मुळे २०१९ साला पासून राज्यातील सर्व कंत्राटी कामगारांना देखील  वेतन वाढ मिळण्यास सुरुवात झाली. राज्यातील महावितरण महापारेषण आणि महानिर्मिती कंपनीतील सर्व वीज कंत्राटी कामगारांना वीज कंपनी प्रशासनाने बेसिक वेतनाच्या २०% एवढी ऐतिहासिक पगार वाढ पूरक भत्ता स्वरूपात लागू केली होती. मात्र  ही पगारवाढ देखील तुटपुंजीच ठरली. महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ संलग्न भारतीय मजदूर संघ ही संघटना कंत्राटी कामगारांच्या समस्यां सोडवण्या साठी स्वतंत्र रजिस्ट्रेशन असलेली व राज्यातील सदस्य संख्येने बलाढ्य अशी संघटना आहे. या वर्षी महावितरण, महापारेषण, महानिर्मिती या वीज कंपनीतील सर्व वीज कंत्राटी कामगारां साठी स्वतंत्र मागणीपत्र देत आहे. या कंत्राटी कामगारांसाठी अनेक हितकारक विविध मागण्यांचा मा.ऊर्जामंत्री, व वीज कंपनी प्रशासनाने साकल्याने सहानुभूतीने व सकारात्मक विचार करावा अशी विनंती संघटनेचया पदाधिकाऱ्यांकडून करण्यात आली.




महानिर्मिती चे व्यवस्थापकीय संचालक मा. डॉ. पी. अनबलगन् साहेब यांना पगारवाढीचा प्रस्ताव देताना प्रमुख पदाधिकारी



महापारेषण कंपनीचे मानव संसाधन विभागाचे संचालक मा.सुगत गमरे साहेब यांना पगारवाढीचा प्रस्ताव देताना प्रमुख पदाधिकारी




महावितरण कंपनीचे मानव संसाधन विभागाचे संचालक मा.अरविंद भादीकर साहेब
यांना पगारवाढीचा प्रस्ताव देताना प्रमुख पदाधिकारी



महावितरण कंपनीचे मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी मा.संजय ढोके साहेब
यांना पगारवाढीचा प्रस्ताव देताना प्रमुख पदाधिकारी



महावितरण कंपनीचे वित्त विभागाचे संचालक मा.दिघे साहेब यांना पगारवाढीचा प्रस्ताव देताना प्रमुख पदाधिकारी

---



# पै.मा.श्री विष्णू जोशीलकर (तात्या) यांची पुढील पाच वर्षासाठी पुन्हा विश्वस्त म्हणून फेरनिवड

कोल्हापूर : लोकराजा राजर्षि शाहू महाराज यांनी सन १९२० साली पुणे येथे स्थापन केलेल्या आल इंडिया श्री शिवाजी मेमोरियल सोसायटीचे विश्वस्त व आमचे मार्गदर्शक महाराष्ट्र वीज कामगार महासंघाचे प्रभारी, महाराष्ट्र केसरी पैलवान मा.श्री विष्णू जोशीलकर (तात्या ) यांची पुढील पाच वर्षासाठी पुन्हा विश्वस्त म्हणून फेरनिवड झाल्या बद्दल तात्यांचे महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाच्या वतीने मन:पूर्वक अभिनंदन व पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा. सदरच्या निवडी बद्दल श्रीमंत छत्रपती शाहू महाराज यांच्या हस्ते तात्यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी माजी खासदार महाराज युवराज संभाजीराजे छत्रपती व महाराज कुमार मालोजीराजे छत्रपती उपस्थित होते.

## वर्धा सर्कल कार्यालय येथे नव्याने रुजू झालेले मानव संसाधन विभागाचे व्यवस्थापक मा.श्री गिरी साहेब यांना सदिच्छा भेट



वर्धा : दिनांक ७ सप्टेंबर २०२३ रोजी वीज कंत्राटी कामगार संघाचे वर्धा येथील प्रमुख पदाधिकारी व महाराष्ट्र वीज कामगार महासंघाचे उपमहामंत्री श्री.खुशालजी झाडे साहेब यांनी वर्धा सर्कल कार्यालय येथे नव्याने रुजू झालेले मानव संसाधन विभागाचे व्यवस्थापक मा.श्री गिरी साहेब यांना सदिच्छा भेट दिली व वीज कंत्राटी कामगारांच्या प्रश्नांवरती चर्चा केली.काही महिन्यांपासून कंत्राटदाराने आकसापोटी कामावरून कमी केलेले कंत्राटी कामगार राहुल बोंडसे यांना परत कामावर घेण्यासाठी मानव संसाधन विभागाचे श्री गिरी साहेब यांच्याशी वीज कंत्राटी कामगार संघाचे जिल्हा अध्यक्ष श्री मुरलीधर माजरीकर व महाराष्ट्र कामगार महासंघाचे उप महामंत्री श्री खुशालजी झाडे साहेब यांनी सविस्तर चर्चा केली. तसेच हिंगणघाट विभागाचे अध्यक्ष श्री हेमंत वडे यांनी वीज कंत्राटी कामगार विक्रम नागपुरे यांच्या माहे मार्च – २०२३ चे रखडलेल्या वेतानाबद्दल चर्चा केली व मे.लिमरा सर्विसेस कडून कामगारांचे मासिक वेतन वेळेवर होत नसल्याचे सांगितले. त्यावर श्री गिरी साहेब यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. या वेळी श्री.राहुल बोडसे सचिव वर्धा सर्कल, श्री.आशिष भोयर सचिव हिंगणघाट विभाग, श्री.मोहन राऊत संघटन प्रमुख तसेच श्री.नंदकिशोर कंडे सदस्य वीज कंत्राटी कामगार संघ हिंगणघाट विभाग इत्यादी उपस्थित होते.

---




कामगारमंत्री मा.ना.सुरेश भाऊ खाडे यांना निवेदन

सांगली: १७ सप्टेंबर रोजी विश्वकर्मा जयंती व राष्ट्रीय श्रमिक दीना निमित्ताने भारतीय मजदूर संघ सांगली येथे कामगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कामगारमंत्री मा.ना.सुरेश भाऊ खाडे यांना महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ सांगली जिल्हाध्यक्ष गणेश पाटील, श्रीमंत काळेल शंकर माळी अन्य कामगार यांनी निवेदन सादर केले, या कार्यक्रमाला ॲड. विशाल मोहिते पाटील उपस्थित होते.



पुणे : भारतीय मजदूर संघाच्या राष्ट्रीय उपाध्यक्षा मा.नीताताई चौबे यांनी १३ सप्टेंबर २०२३ रोजी भारतीय मजदूर संघाच्या विश्वकर्मा भवन पुणे येथील कार्यालयास भेट दिली. या वेळी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले या प्रसंगी भारतीय मजदूर संघ पुणे जिल्हा सचिव मा.बाळासाहेब भुजबळ, अध्यक्ष मा.अर्जुन चव्हाण, महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाचे सरचिटणीस मा. सचिन मेंगाळे व बीडी मजदूर महासंघाच्या कोषाध्यक्ष मा.बेबीराणी डे, व महिला विभाग प्रमुख मा.वंदना कामठे उपस्थित होत्या.या वेळी पुणे विभागातील महत्वपूर्ण घटना तसेच महिला विभागातील विविध कामांची माहिती व आगामी योजना बाबत चर्चा करण्यात आली.

## गडचिरोली सर्कल मधील सर्व वीज कंत्राटी कामगारांची बैठक

गडचिरोली : महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ महावितरण गडचिरोली सर्कल मधील सर्व वीज कंत्राटी कामगारांची बैठक सेमाना हनुमान मंदिर देवस्थान गडचिरोली येथे २१ सप्टेंबर रोजी संपन्न झाली.सदर बैठकीत गडचिरोली सर्कल कार्य समितीची नियुक्ती करण्यात आली या बैठकीला भारतीय मजदूर संघाचे गडचिरोली जिल्हा प्रभारी तथा महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाचे चंद्रपूर जिल्हाध्यक्ष हेमराज गेडे यांचे कामगारांच्या समस्या बाबत प्रत्येक विषयावर प्रमुख मार्गदर्शन लाभले. त्यांची संघटनेच्या प्रती असलेली निष्ठा व कामगारांच्या प्रती असलेली तळमळ इतरांना प्रेरणादायक ठरेल अशीच होती व दीर्घ अनुभवातून सर्वांच्या समस्या जाणून घेतल्या तसेच गडचिरोली सर्कलमध्ये संघटनेचे कार्य वाढावे या करिता सर्कल च्या नूतन कार्य समितीची निवड सुद्धा करण्यात आली.दिवसभर मुसळधार पाऊस असताना देखील या बैठकीला मोठ्या संख्येने कंत्राटी ऑपरेटर व टेक्निशियन उपस्थित होते.मा.हेमराज गेडे हे चंद्रपूर कॅगे रहिवासी आहेत. त्यांना चालता येत नाही त्यांना व्हील चेअरवरच बसावे लागते मात्र भारतीय मजदूर संघावर असलेली निष्ठा, राष्ट्रहित उद्योगहित व कामगारहित या त्रिसूत्रीला त्यांनी आपल्या जीवनात उतरले असल्याने ते झोकून देऊन या परिस्थितीत देखील कामगार हितार्थ विविध भागात दौरे करतात जेथे धड धाकट पदाधिकारी सर्व सुख सुविधा असतांना देखील काम करत नाही अशा पदाधिकारी यांना हेमराज गेडे यांच्याकडून नक्कीच प्रेरणा मिळेल यात शंका नाही.







## वीज कामगार महासंघाच्या वतीने कायम कामगारांच्या पगारवाढ मागणी पत्रात वीज कंत्राटी कामगारांच्या वेतनवाढी बाबत मागणी

मुंबई : वीज कामगार महासंघाच्या वतीने कायम कामगारांच्या पगारवाढ मागणी पत्रात राज्यातील वीज कंत्राटी कामगारांच्या वेतनात देखील वाढ करावी अशी मागणी मागील वेळे प्रमाणे यावर्षी देखील वीज कामगार महासंघाने आवर्जून केली. या मागणी पत्राचा प्रस्ताव महावितरण कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक मा.लोकेश चंद्र व तसेच प्रधान सचिव ऊर्जा यांना देतांना वीज कामगार महासंघाचे अध्यक्ष मा. विठ्ठलजी भालेराव साहेब व सरचिटणीस मा.अरुणजी पिवळ साहेब व वीज कामगार महासंघाचे अन्य प्रमुख पदाधिकारी

---

### ७. कंत्राटी कामगारांसाठीच्या मागण्या

१. तीनही कंपनीत कार्यरत सुरक्षा रक्षक कंत्राटी कामगारांना, नियमित कामगारांना दि. ०१/०४/२०२३ पासून देण्यात येणाऱ्या पगारवाढीच्या टक्केवारीप्रमाणे वाढ द्यावी. सध्या जे कंत्राटी कामगार आहेत ते अनेक वर्षांपासून कंत्राटी पध्दतीने विविध कंपन्यांमध्ये कार्यरत आहेत. त्यांचा अनुभव लक्षात घेता अशा सर्व कंत्राटी कामगारांना कंपनीच्या सेवेत कायम करावे.

२. कंत्राटी कामगारांना जे अत्यल्प वेतन मिळत आहे त्यात कायम कामगारांच्या वेतनवाढीच्या टक्केवारीप्रमाणे वाढ करावी.

३. कंत्राटी कामगारांना मिळणारे वेतन मुळात अत्यल्प आहे. परंतु ते देखील त्यांना वेळेवर मिळत नाही याबाबत व्यवस्थापनाने वारंवार सुचना दिल्या असतांना क्षेत्रीय कार्यालयात त्याची अंमलबजावणी होत नाही. अशा अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करावी.

४. समान काम समान दाम या मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाचे पालन व्हावे.

५. मेडिक्लेमची व्याप्ती कंत्राटी कामगारांपर्यंत वाढवावी.

६. कंत्राटी कामगाराची भरती कंत्राटदारामार्फत करण्याऐवजी संबंधित कंपनीनेच त्यांना कंत्राटी कामगार म्हणून नियुक्ती द्यावी. जेणेकरुन कंत्राटदाराकडून आज जे शोषण होते आहे ते तरी थांबेल.

७. ई.एस.आय., प्रॉव्हिडंट फंड, बोनस या कायदेशीर तरतुदींपासून कंत्राटी कामगार वंचित राहणार नाहीत याची जबाबदारी प्रधान मालक म्हणून कंपनीने घ्यावी.

---

# भुसावळ दिपनगर वीज निर्मीती केंद्रासमोर – जाहीर द्वार सभा



भुसावळ : महाराष्ट्र वीज कामगार महासंघा तर्फे कायम कामगारांच्या पगारवाढीचा तसेच कंत्राटी कामगारांच्या वाढीचा प्रस्ताव तिन्ही वीज कंपनीला सादर करण्यात आला या पगारवाढ मागणी पत्रात मागीतलेल्या मागण्या सर्व अधिकारी ,कर्मचारी तसेच संघटनेच्या सभासद माहीती मिळावी म्हणुन दि १५ सप्टेबंर २०२३ रोजी भुसावळ दिपनगर वीज निर्मीती केंद्रासमोर दुपारी १२ वा गणपती मंदीर जवळ जाहीर द्वार सभा घेण्यात आली या वेळी मा.अनंत जाधव यांनी सविस्तर असे मार्गदर्शन केले ,मा. संजय अमोदकर यांनी भत्ते व कंत्राटी कामगार यांच्या मागण्या तसेच डि के झासकर यांनी जेष्ठ नागरीक यांच्या मागण्या बाबत माहिती दिली तर सुनिता नाईक मॅडम यांनी महीलांना सुविधा व मागण्या या विषयावर मार्गदर्शन केले.या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन श्री संजय तायडे यांनी केले तर वीज कंत्राटी कामगार संघाचे केंद्रीय उपाध्यक्ष मा.सचिन भावसार यांनी या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन केले

# महावितरण, रास्तापेठ, पुणे कार्यालया समोर–जाहीर द्वार सभा





पुणे : वीज कामगार महासंघाच्या वतीने कायम कामगारांच्या पगारवाढ मागणी पत्रात राज्यातील वीज कंत्राटी कामगारांच्या वेतनात देखील वाढ करावी अशी मागणी मागील वेळे प्रमाणे यावर्षी देखील केली. या मागणी पत्राचे वाचन वीज कामगार महासंघ पुणे झोन अंतर्गत दि.१३/९/२३ रोजी पुणे रास्ता पेठ कार्यालया समोर झाले. पगारवाढ प्रस्ताव बाबतीत व संघटनेने केलेल्या विविध मागण्या साठीद्वार सभा घेण्यात आली सदर द्वार सभेत पदाधिकारी व सभासद यांना प्रस्ताव बाबतीत माहिती देण्यात आली सदर द्वार सभेला महाराष्ट्र वीज कामगार महासंघाचे केंद्रीय संघटनमंत्री मा.हिंगमीरे साहेब, मा.सोमवंशी साहेब, पुणे झोन अध्यक्ष सुरेश जाधव व अन्य अनेक पदाधिकारी व कामगार उपस्थित होते.महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाचे संघटन मंत्री मा.उमेश आनेराव यांनी कंत्राटी कामगारांच्या हितार्थ वीज कामगार महासंघाने मागितलेल्या मागण्यांचे वाचन सर्व सभेसमोर केले या वेळी पुणे झोन सचिव निखिल टेकवडे व अन्य वीज कंत्राटी कामगार देखील मोठ्या संख्येने उपस्थित होते

# महावितरण, अकोला कार्यालया समोर–जाहीर द्वार सभा




अकोला : वीज कामगार महासंघाच्या वतीने कायम कामगारांच्या पगारवाढ मागणी पत्रात राज्यातील वीज कंत्राटी कामगारांच्या वेतनात देखील वाढ करावी अशी मागणी मागील वेळे प्रमाणे यावर्षी देखील केली. या मागणी पत्राचे वाचन वीज कामगार महासंघ अकोला झोन अंतर्गत दि.१५/९/२३ रोजी झाले. पगारवाढ प्रस्ताव बाबतीत व संघटनेने केलेल्या विविध मागण्या साठीद्वार सभा घेण्यात आली सदर द्वार सभेत पदाधिकारी व सभासद यांना प्रस्ताव बाबतीत माहिती देण्यात आली सदर द्वार सभेला कामगार महासंघाचे राज्य सचिव मा.अनिलजी माहोरे,नागपूर प्रादेशिक कार्यालयाचे अध्यक्ष मा. गणेशजी भंडारी, सर्कल अध्यक्ष,मा.नरेंद्र औतकर सर्कल सचिव मा.विकास कोकाटे, वीज कंत्राटी कामगार संघाचे अकोला झोन अध्यक्ष मा.गणेश धारपवार, वीज कंत्राटी कामगार संघाचे अकोला झोन सचिव विनोद फुलारी, अनिल बोरसे, शेख अन्सार भाई इत्यादी उपस्थित होते.

# जेष्ठ मार्गदर्शक मा.अण्णाजी देसाई साहेब यांचे अनमोल मार्गदर्शन



दिनांक १० सप्टेंबर २०२३ रोजी पुणे येथील सौदामिनी हॉल,मंगळवार पेठ येथे महाराष्ट्र वीज कामगार महासंघाची बैठक संपन्न झाली या बैठकीच्या दुपार सत्रात महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाचे जेष्ठ मार्गदर्शक मा.अण्णाजी देसाई साहेब यांची संघटनेचे प्रदेश अध्यक्ष मा.निलेश खरात, महामंत्री मा.सचिन मेंगाळे, संघटनमंत्री मा.उमेश आनेराव, कोषाध्यक्ष मा. सागर पवार, उपमहामंत्री मा.राहुल बोडके, पुणे झोन सचिव मा.निखिल टेकवडे यांनी भेट घेतली व महाराष्ट्रातील वीज कंत्राटी कामगार संघाच्या पगार वाढीच्या मागनी पत्राबद्दल मार्गदर्शन घेतले तसेच महाराष्ट्रात कंत्राटदारांनी घातलेला धुमाकूळ व संघटना त्याबद्दल करत असलेली कारवाई बाबतची माहिती त्यांना देण्यात आली.जेष्ठ मार्गदर्शक मा.अण्णाजी देसाई साहेब यांनी कंत्राटी कामगारांच्या पगार वाढी साठीच्या प्रस्तवात काही सूचना सुचवल्या त्याची अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेण्यात आला.वीज कामगार संघाचे अध्यक्ष मा.विठ्ठलजी भालेराव, महामंत्री मा. अरुणजी पिवळ व वीज कंत्राटीकामगार संघाचे पालकमंत्री मा सुभाष सावजी, मा. शंकरराव पहाडे यांचे मार्गदर्शन घेऊन वीज कंत्राटी कामगार संघाचा पगार वाढीचा प्रस्ताव तयार करण्यात आला.

# भारतीय मजदूर संघाच्या वतीने पर्यावरण दिन साजरा




पुणे : थर्माकोल, प्लॅस्टिकच्या वापर बंद करून वसुंधरेचे रक्षणासाठी पर्यावरण च्या चळवळीत कार्यरत रहा.भारतीय मजदूर संघाचे पर्यावरण दिनाच्या निमित्ताने आवहान २८ ऑगस्ट २०२३ हा दिवस राष्ट्रीय पर्यावरण दिन म्हणून देशभरात मोठ्या प्रमाणात विविध क्षेत्रात सेमिनार,मेळावे,वृक्षारोपण, जनजागृती च्या माध्यमातून भारतीय मजदूर संघाच्या वतीने साजरा केला गेला,याचाच भाग म्हणून भारतीय मजदूर संघ पुणे जिल्ह्याच्या वतीने विश्वकर्मा भवन शनिवार पेठ पुणे येथे पर्यावरण रक्षणासाठी कार्यरत द क्रिएटीव्ह पर्यावरण दक्षता मंच चे अध्यक्ष श्री प्रशांत अवचट प्रमुख वक्ते म्हणून होते, मंचावर भारतीय मजदूर संघ पुणे जिल्हा अध्यक्ष श्री अर्जुन चव्हाण व पर्यावरण रक्षण मंच चे पुणे जिल्हा प्रमुख अभय वर्तक होते. गेल्या काही वर्षात पर्यावरणा मध्ये मोठ्या प्रमाणात सतत बदल होत आहेत, ऋतुमानात बदल, पावसाचे बदललेल्या प्रमाण, तापमानात वाढ, ई बाबी मोठ्या प्रमाणात निसर्गात बदल होत आहेत, या परिणाम समाजात होतो आहे, प्लॅस्टिकच्या वस्तूंच्या वापर केल्या मुळे, निसर्ग ची हानी होते आहे, जल प्रदुषण, जमीनीवर परिणाम होतो आहे. त्यामुळे पुर्नवापर होणारे वस्तूंच्या वापर करण्यासाठी जनजागृती करून अंमलबजावणी करण्यासाठी आग्रही राहली पाहिजे असे मनोगत श्री प्रशांत अवचट यांनी केले आहे. तसेच संत ज्ञानेश्वर महाराज, तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्यात आंळंदी ते पंढरपूर दिंडी मध्ये नैसर्गिकरीत्या पत्रावळ्या चा वापर करण्यात साठी जनजागृती करून महत्वपूर्ण योगदान दिले आहे. या वेळी अभय वर्तक यांनी प्रास्ताविक केले, व आभार प्रदर्शन अध्यक्ष श्री अर्जुन चव्हाण यांनी केले आहे.या कार्यक्रमात भारतीय मजदूर संघ पुणे जिल्हा सेक्रेटरी बाळासाहेब भुजबळ,अखिल भारतीय ठेका मजदूर महासंघाचे सरचिटणीस सचिन मेंगाळे,कंत्राटी कामगार संघांचे उमेश आणेराव, ऊमेश विस्वाद,रविंद्र देशपांडे,विवेक ठकार , बेबीराणी डे,आदी पदाधिकारी उपस्थित होते.

---




शहिद कायम कामगार व कंत्राटी कामगार यांचे स्मरण.

पुणे विभागातील क्रांतिकारी लाईन स्टाफ सेनेतर्फे सोमवार दिनांक ०४ सप्टेंबर २०२३ रोजी पुणे झोन रास्तापेठ ऑफिसमोर वीज उद्योगात काम करतांना कायम कामगार व वीज कंत्राटी कामगार यांचा अपघात होऊन शहीद झालेल्या कामगारांसाठी एक शोक सभा घेऊन श्रद्धांजली वाहण्यात आली. क्रांतिकारी लाईन स्टाफ सेनेच्या पुणे झोनमधील पदाधिकाऱ्यांनी महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाचे केंद्रीय उपमहामंत्री श्री राहुल बोडके व पुणे झोनमधील पदाधिकाऱ्यांना फोनद्वारे आपण या शोक सभेसाठी उपस्थित राहून श्रद्धांजली वहावी व उपस्थित राहून सर्व कामगारांना मार्गदर्शन करावे असे कळवले. या शोकसभेला कंत्राटी कामगार संघाचे उपमहामंत्री मा.राहुल बोडके, पुणे झोन सचिव मा.निखिल टेकवडे कामगार मोठ्या प्रमाणात उपस्थित राहिले. सर्वांनी शहीद कामगारांना श्रद्धांजली अर्पण केली.






# भारतीय मजदूर संघ की विश्वकर्मा जयंती के अवसर पर भव्य रॅली

कुरकुंभ : श्रमिकों के हित के लिए, उनके अधिकारों की रक्षा के लिए संघर्ष करेंगे-रविन्द्र हिम्मते राष्ट्रीय महामंत्री भारतीय मजदूर संघविश्वकर्मा जयंती के अवसर पर कुरकुंभ में भारतीय मजदूर संघ की मोटरसाइकिल रैली के समापन पर की गई घोषणा१७ सितंबर को विश्वकर्मा जयंती (राष्ट्रीय श्रमिक दिवस) के अवसर पर, कुरकुंभ एमआईडीसी, दौंड जिला, पुणे में भारतीय मजदूर संघ की ओर से एक रैली आयोजित की गई और क्षेत्र के स्थायी और अनुबंध श्रमिकों से भारतीय मजदूर संघ के संगठन में शामिल होने की अपील की गई। .इस अवसर पर आयोजित श्रमिक सभा में मुख्य वक्ता के रूप में मार्गदर्शन करते हुए भारतीय मजदूर संघ के राष्ट्रीय महामंत्री मा.रविन्द्र हिम्मते ने कहा कि भारतीय मजदूर संघ शोषित और वंचित श्रमिकों को न्याय दिलाने के लिए लगातार काम कर रहा है और नंबर १ के रूप में देशभर काम कर रहा है। संगठन राष्ट्र हित , उद्योग हित और श्रमिक हित इस नीति को अपनाकर श्रमिकों में नेतृत्व विकसित कर श्रमिकों को प्रोत्साहित कर रहा है। श्रमिकों को उद्योग की प्रगति और विकास के लिए प्रयास करना चाहिए और प्रबंधन ने श्रमिकों, अनुबंध श्रमिकों को एक महत्वपूर्ण कारक मानते हुए श्रमिकों को वेतन और सेवा सुविधाएं दी जानी चाहिए, प्रगति में श्रमिकों का योगदान महत्वपूर्ण है उद्योगमे स्थाई और अनुबंध श्रमिकों के बीच वित्तीय अंतर को कम करने के लिए त्रिपक्षीय प्रयास की आवश्यकता है। सरकार को श्रमिकों के हितों में सकारात्मक भूमिका निभानी चाहिए।साथ ही संविदा कर्मियों के विभिन्न मुद्दों पर चर्चा करते हुए संविदा कर्मियों ने संगठन बनाकर चुनौती दी है कि भारतीय मजदूर संघ आपके साथ खड़ा रहेगा और न्याय अधिकार की लड़ाई लड़ेगा. भारतीय मजदूर संघ मजदूरों के हित, रोजगार की रक्षा के लिए संघर्ष करने जा रहा है और मजदूरों से सक्रिय होने का आह्वान किया है. भगवान श्री विश्वकर्मा जयंती की सभी कार्यकर्ताओं को शुभकामनाए दिया है । इस अवसर पर भारतीय मजदूर संघ पुणे जिला अध्यक्ष श्री अर्जुन चव्हाण, सचिव बालासाहेब भुजबल, मजदूर महासंघ के जोनल सचिव श्री सुरेश जाधव, संजय मेनकुदळे , गणेश टिंगरे, ज्ञानेश्वर जाधव, संतोष शितोले, अन्ना महाजन, विवेक ठाकर, अजेंद्र जोशी, महाराष्ट्र विज कंत्राटी कामगार संघ के राहुल बोडके उपमहामंत्री कोषाध्यक्ष सागर पवार उपस्थित थे और बड़ी संख्या में स्थानीय श्रमिक प्रतिनिधि शामिल हुए। अखिल भारतीय ठेका मजदूर महासंघ के महामंत्री सचिन मेंगाळे ने सभा का प्रास्तावीक परिचय दिया और धन्यवाद ज्ञापन राहुल गोरे ने किया।इस अवसर पर हेन्केल एडेसिव कुरकुंभ से मोटरसाइकिल रैली निकाली और कारगिल इंडिया कुरकुंभ में एक सार्वजनिक बैठक की, जिसमें उन्होंने देश के हित में, काम-का लेंगे पूरा दाम के नारे के साथ कार्यकर्ताओं के लिए न्याय की जोरदार मांग की। रैली का नेतृत्व और योजना कारगिल इंडिया वर्कर्स कमेटी, ईटोनेंस फाइन्स केमिकल वर्कर्स कमेटी, सिल्पा लिमिटेड वर्कर्स कमेटी, हेनकेल एडहेसिव वर्कर्स कमेटी, ऑनर लैब वर्कर्स कमेटी, औरंगाबाद डिसिलरी वर्कर्स कमेटी, यूनाइटेड स्पिरिट वर्कर्स कमेटी, महाराष्ट्र विज कंत्राटी कामगार संघ , एसोसिएशन, एपीआई/आईईसी न्यूमेटिक्स वर्किंग कमेटी नेतृत्व किया






# मा.सौ.शर्मिलाताई पाटील यांच्या सेवानिवृत्ती निमित्त जाहीर सत्कार

मुंबई : मा.सौ.शर्मिलाताई पाटील या महावितरण मध्ये ३७ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेतुन ३० एप्रिल २०२३ रोजी सेवानिवृत्त झाल्या. त्यांच्या सेवानिवृत्ती चा कार्यक्रम मुंबई प्रकाशगड येथील हॉल मध्ये दिनांक १४ सप्टेंबर २०२३ रोजी आयोजित करण्यात आला होता. मा.सौ.शर्मिलाताई पाटील महाराष्ट्र वीज कामगार महासंघाच्या उपाध्यक्षा तसेच त्या अखिल भारतीय विद्युत मजदुर महासंघाच्या देखील उपाध्यक्षा असून भारतीय मजदुर संघाच्या महीला प्रतीनीधी आहेत.प्रकाशगडावर वीज कामगार महासंघाचे तळपत्या तलवारी प्रमाणे त्यांचे नेतृत्व होते. वीज कंत्राटी कामगार संघाच्या प्रत्येक आंदोलनात त्यांचा सक्रिय सहभाग असायचा, प्रकाशगड येथील कंत्राटी कामगार यांच्या समस्यां देखील प्रशासनाकडे नेऊन त्याचा सोक्षमोक्ष लावूनच त्या शांत व्हायच्या. कंत्राटी कामगारांच्या आंदोलनात आलेल्या कामगारांना चहा, नाश्ता, भोजन व्यवस्था त्या स्वतःकडे घेऊन नीट लक्ष देऊन ही जबादारी त्या पूर्ण करायच्या, या कामात अर्थातच, वीज कामगार महासंघाचे उप महामंत्री मा. प्रशांत भांबुर्डेकर, अनंत तरे, दत्ता न्हावकर इत्यादी पदाधिकारी देखील झोकून देऊन प्रकाश गडावरील सर्व आंदोलनात सहभागी होणारी ही मंडळी, आज प्रकाशगड , तसेच धारावी येथील कंत्राटी कामगारांवर होणाऱ्या अन्याय व अत्याचाराला विरोध करत कंत्राटी कामगार संघा आधी हल्ला करणारी ही सर्व मंडळी.मा.सौ.शर्मिलाताई पाटील यांच्या सेवा निवृत्ती कार्यक्रम प्रसंगी, महावितरण कंपनीचे मानव संसाधन विभागाचे संचालक मा.अरविंदजी भादीकर साहेब, वीज कामगार संघाचे ज्येष्ठ मार्गदर्शक मा.अण्णाजी देसाई साहेब, अध्यक्ष मा.विठ्ठलजी भालेराव, महामंत्री अरुणजी पिवळ, उप महामंत्री मा.प्रशांतजी भांबुर्डेकर,वीज कंत्राटी कामगार संघाचे निवासी सचिव सुनील कांबळे, श्रीकांत मगरे, सविता येळवे, गीता रणधीर इत्यादी प्रमुख पदाधिकारी व अन्य कामगार उपस्थित होते. वीज कंत्राटी कामगार संघाच्या वतीने मा.सौ.शर्मिलाताई पाटील यांना पुष्पगुच्छ देऊन त्यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

---



कल्याण : दिनांक १४ सप्टेंबर २०२३ रोजी तिन्ही वीज कंपन्यामधील सर्व वीज कंत्राटी कामगार यांच्या समस्या बाबतचे निवेदन मा.डॉ.श्रीकांत एकनाथ शिंदे साहेब खासदार कल्याण लोकसभा यांना देण्यासाठी त्यांचे स्वीय साहाय्यक मा.प्रफुल देशमुख साहेब यांची भेट महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाचे केंद्रीय सचिव मा.संदीप गवारी तसेच संघटनेचे कल्याण झोन अध्यक्ष मा. मनोज मनुचारी यांनी डोंबवली येथील मध्यवर्ती कार्यालय येथे घेतली. सदर बैठकीत संघटनेकडून त्यांना मा.खासदार डॉ. श्रीकांत एकनाथ शिंदे साहेब यांच्या सोबत संघटनेच्या शिष्ट मंडळा सोबत एक मीटिंग घेण्यासंदर्भात विनंती करण्यात आली.




पुणे : भारतीय मजदूर संघाचे राष्ट्रीय महामंत्री मा.रविंद्रजी हिमते यांना दिनांक १७ सप्टेंबर २०२३ रोजी त्यांच्या जन्मदिवसा दिवशी महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाच्या प्रमुख पदाधिकारी यांच्या वतीने भगवान विश्वकर्मा जयंती व राष्ट्रीय श्रमिक दिवसाच्या निमित्ताने कुरकुंभ पुणे येथे आयोजित कार्यक्रम स्थळी शुभेच्छा देण्यात आल्या.

---



जालना : २४ सप्टेंबर २०२३ रोजी जालना जिल्ह्यातील सर्व वीज कंत्राटी कामगाराच्या विविध प्रश्नांवर व संघटनेच्या उर्वरित कार्यकारणी नव्याने करण्या करिता संघटनेची वार्षिक मीटिंग घेण्यात आली. या वेळी कामगारांना मार्गदर्शन करण्याकरिता संघटनेचे केंद्रीय सह संघटनमंत्री मा.तात्यासाहेब सावंत साहेब, संभाजीनगर झोन सचिव मा.सचीन अंभोरे झोन, कार्याध्यक्ष गजानन बोरडे, उपाध्यक्ष मा.मोकीदां गोरे, जालना जिल्हा अध्यक्ष मा.अशोक खंडागळे. जालना जिल्हा सचिव मा.विठ्ठल कळकुंबे, कार्याध्यक्ष मा.वसंत सोनुने, उपाध्यक्ष मा.गोकुळ घाडगे, जालना डिव्हीजन न.१अध्यक्ष मा.राजेश क्षिरसागर, जालना डिव्हीजन न.२ अध्यक्ष मा.संदीप टोपे तसेच जिल्ह्यातील सर्वच पदाधिकारी उपस्थित होते. नुतन कार्यकारणीस हार्दिक शुभेच्छा...

---

# गणेश पूजन म्हणजे गुणांचे पूजन...

भाद्रपद शुद्ध चतुर्थीला म्हणजे गणेश चतुर्थीला घरोघरी गणपती आणून, त्याची प्रतिष्ठापना करून, पूजा करण्याची व अनंत चतुर्दशीला गणेश विसर्जन करण्याची प्राचीन प्रथा आहे.कोणत्याही शुभ कार्याची सुरुवात गणपतीच्या पूजनाने करण्याची धार्मिक परंपरा आहे. देवी पार्वतीने दिलेल्या आदेशाचे तंतोतंत पालन करण्यासाठी गणपती शंकराला दारावर अडवतात.यामुळे शंकर गणपतीचे मुंडके छाटतात.या कृतीमुळे, दुःखी झालेल्या पार्वतीला संतुष्ट करण्यासाठी शंकर त्यांच्या पार्षदाने आणलेले हत्तीचे मस्तक गणपतीच्या धडावर ठेवून त्याला सजीव करतात. गणपतीचे मानवी मुंडके त्याच्या धडावर न बसवता शंकर हत्तीचेच मुंडके कां बसवतात?असा प्रश्न आपल्याला कधीतरी पडला असेल ना? अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न करताना पौराणिक कथांमध्ये वापरलेली रूपके व प्रतीके यांच्या मागे दडलेला अर्थ शोधावा लागतो.त्यामध्ये सामावलेला जो भावगर्भित अर्थ आहे त्याचा समतोल बुद्धीने मागोवा घ्यावा लागतो.बुद्धीवान चिंतक व विश्लेषक व्यक्ती त्यांच्या विचार मंथनातून व चिंतनातून रूपकं व प्रतीकं यांच्यामागे दडलेला अर्थ शोधून काढतात आणि आपल्या विचारासाठी तो आपल्या समोर ठेवतात.पूजनीय पांडुरंगशास्त्री आठवले यांनी त्यांच्या चिंतनातून गणेशाचा जो अर्थ सांगितला आहे तो आपण आपल्या परीने समजून घेऊया. गणेश मूर्ती बारकाईने न्याहाळा.त्याचे रूप, मस्तक व हातातील आयुधं पहा. हातातील अन्य वस्तू व मुद्रा पहा.नंतर त्यावर विचार करायला सुरुवात करा.या सर्व गोष्टी निरनिराळ्या गुणांचे निदर्शक आहेत असे आपल्या लक्षात येईल.



गणपतीचे हत्तीचे मस्तक हे विशाल बुध्दीचे प्रतीक आहे.गणपती म्हणजे गणांचा स्वामी वा नेता.स्वामी वा नेता बुद्धीमान असला पाहिजे.ज्याला जीवनात उंच भरारी घेवून त्या त्या क्षेत्रातील सर्वोच्च शिखर गाठायचे आहे त्याने बुद्धीमान असले पाहिजे.निर्बुद्ध स्वामी वा नेता आपल्या गणाला व समाजाला योग्य दिशेने, योग्य ठिकाणी व जीवनाच्या उंच शिखरावर नेऊ शकेल काय आपण उत्तर शोधा. गणपतीचे हत्तीचे कान सुपासारखे असतात.सुपाने आपण धान्य पाखडतो. स्वच्छ धान्य सुपात ठेवून धान्याची फोलपटं फेकून देतो.कानाने ऐका. त्यातील चांगल्या गोष्टींचे सार ग्रहण करा व असार फेकून द्या, म्हणजे योग्य ज्ञान ग्रहण करा असा बहुमोल संदेश मोठे कान देतात. गणपतीचे हत्तीसारखे बारीक डोळे मानवाला जीवनात सूक्ष्म दृष्टी ठेवण्याची प्रेरणा देतात.प्रत्येक गोष्ट बारकाईने पहावी व निरखावी आणि त्यातून शिकण्यासारखे जे असेल ते आत्मसात करावे व वाईट आणि दोषयुक्त गोष्टींपासून दूर रहावे.मानवाकडे भविष्याचा वेध घेणारी दृष्टीही असावी असे बारीक डोळे सुचवतात. हत्ती सोंडेने दूरवरचे हुंगू शकतो. त्यामुळे त्याला दूरपर्यंतचा गंध त्वरित येतो.जीवनात दूरदर्शीपणा हवा व स्वामी वा नेत्यांकडे तो असायलाच हवा याचा यातून बोध मिळतो. गणेशाचा पूर्ण सुळा श्रद्धेचे व अर्धा सुळा बुद्धीचे प्रतीक आहे.जीवन विकास साधण्यासाठी श्रद्धा व बुद्धीची गरज असते.एकवेळ बुद्धी थोडी कमी असली तरी चालेल पण श्रद्धा वा विश्वास पूर्ण हवा याचे सुळे मार्गदर्शन करतात. गणपतीचे पाय लहान आहे.ते शिकवतात कोणतेही काम करताना

अती घाई करू नका किंवा उतावीळ होऊ नका.हळूहळू वा दमादमाने पुढे जा,कार्य सुदृढ करा व सफल व्हा. गणपतीचे पोट मोठे असल्याने त्याला लंबोदर म्हणतात.सर्वांनी सांगितलेल्या सर्व गोष्टी,गोड कडू अनुभव,मान अपमान अशा गोष्टी पोटात साठवून ठेवण्याचे सामर्थ्य प्रत्येक मानवात निर्माण झाले पाहिजे. गणपतीला चार हात आहेत.एका हातात अंकुश आहे.काम, क्रोध,लोभ, मोह, मद, मत्सर,वासना यावर जीवनात संयम वा ताबा असणे गरजेचे आहे याचे भान अंकुश देतो.अनीती, अत्याचार, अन्याय,अमानुषता, वाईट गोष्टी यांना बळी पडलेल्यांना योग्य मार्गावर आणून त्यांना चांगला आचार, प्रामाणिक व्यवहार याकरीता प्रवृत्त करण्यासाठी त्यांना दंड व शिक्षा करण्याचे सामर्थ्य असले पाहिजे हे परशू नावाचे आयुध सुचवते. तिसऱ्या हातातील मोदक आनंदाचे प्रतीक आहे.मोदकाचे बाह्य अंग सुबक व आकर्षक असते.मोदकाचे आतील सारण सात्विक, चविष्ट व पौष्टिक असते.या दोन्ही गोष्टी एकत्रित आनंद देतात.ज्ञान, तत्वज्ञान,कला, साहित्य, संगीत यांचा आनंद अनुभवायचा असेल तर बाह्य रूप व अंतरंग या दोहोंचा शोध घेतला पाहिजे. चवथा हात आशीर्वाद देतो.मानवाने सर्वांचे हित,सुख, समृद्धी चिंतावी व जमल्यास यासाठी इतरांना सहाय्य करावे. गणपतीचे वाहन उंदीर आहे.उंदीर लहान असल्यामुळे सर्वत्र संचार करू शकतो.मानवाला असा संचार करायचा असेल तर तो कितीही मोठा असला तरी विनम्र व जमीनीवर राहिला पाहिजे.उंदीर चावण्यापूर्वी फुंकर घालून चावतो.त्यामुळे चावलेले चावताना जाणवत नाही.इतरांना त्यांच्या चुका,उणिवा,दोष,वाईट गोष्टी या बद्दल सांगताना त्याला समजेल पण वाईट वाटणार नाही अशा भाषेत सांगावे. गणपतीला आपण दुर्वा अर्पण करतो. दुर्वा हे गवत आहे व त्याला फार मोल किंवा महत्व व्यवहारी जगात नाही.पण त्याचंही महत्व आहे हे बारकाईने अभ्यास केला तर कळते.समाजात कमी महत्वाची कामं करणारी अगणित माणसं असतात. त्यांचं काम फार महत्वाचं असतं व समाजाला अत्यावश्यक असतं.अशांना हीन लेखू नका.त्यांना सन्मान द्या.त्यांना स्वाभिमानी जीवन जगण्यासाठी प्रेरणा द्या. आपण साकार गणपतीची प्रतिष्ठापना करतो व कालांतराने विसर्जन करून त्याला अनंतात विलीन करतो.आपलं आयुष्य याच वाटेने जाणार आहे याचे भान ठेवून इतरेजनांशी प्रेम,सलोखा, आदर,मानवता युक्त वर्तन करा.स्वतः आनंदी रहा व इतरांना आनंदी राहू द्या. गणपतीची पूजा करा.आरती करा. स्तोत्र म्हणा.हे करताना गणपतीचे निरनिराळ्या विद्वानांनी त्याच्या रूपात कल्पिलेले गुण आत्मसात करण्याचा प्रयत्न करत रहा.या गुणांनी आपले व्यक्तिगत व सामूहिक जीवन उन्नत करण्याचा संकल्प करा व तो सिद्धीस नेऊन देश व समाज एकसंध,बलशाली करण्याचा प्रयत्न करा.

सुर्यकांत (मामा) परांजपे

## वेलू गगनावरी

सर्व उद्योगांची जननी वीज
सापडली खाजगीकरण विळख्यात
आस्मानी सुलतानी संकटे घातक
उजाडता नव युगाब्धातील पहिले शतक.

आतबट्ट्याचा एन्रॉन करार
त्या वरकडी बोकळता भ्रष्टाचार
कोलदांडा शून्याधारित अर्थसंकल्प
निस्तरण्या विकल्प खातेबाह्य अधिकारी.

साधनसामुग्री यंत्रणा जुनी पुराणी
खाजगी उद्योगपतींशी स्पर्धा जीवघेणी
निवृत्तीकारणे कामगार संख्या अपुरी
नवचैतन्या नाकारी भरती बंदी.

भरीस भर वीज मंडळ त्रिभाजन
निकोप स्पर्धेनावे कंपनीकरण
एकसंध उद्योगाचे विलगीकरण
कारण सामूहिक शक्तीपाताचे.

होय दमछाक विद्युतीकरण वेग राखता
वाढत्या ग्राहक संख्येस गवसणी घालता
मेटाकुटीस कामगार जनक्षोभ आवरता
उताऱ्यास तोडगा अनिर्बंध कंत्राटीकरण.

एका कामगारास अनेक मालक
कामाच्या तुलनेत वेतन माफक
विपरीत परिस्थितीत धैर्य अलौकिक
एकवटली कंत्राटी कामगार शक्ती.

कंत्राटी कामगार हरहुन्नरी कष्टाळू
ठोठावती दारे हुडकण्या
न्यायदाते कनवाळू
त्याग तपस्या बलिदानाचा
करुनी निर्धारु
भगवा ध्वज खंबीर पाठराखा.

पुण्यनगरीच्या कोथरूड उपनगरात
बीज पेरले ओसाड माळरानात
थंडी वारा उन्ह पाऊस झेलत
कंत्राटी कामगार संघाची
गगनभरारी..श्रश्र..

मा.श्री.शरद संत,पुणे.
माजी अध्यक्ष
वीज कंत्राटी कामगार संघ.